# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

### प्रशासकीय गोषवारा दि.१३ / ९ /2023

**प्रकरण क्र. २०२ :- घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on vehicle (Basic facility development fund) खरेदी कामी प्राप्त निविदेतील दरास मंजुरीबाबत. (Tender Id No. 2023_MBMC_915673_1)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा गोळा करण्यासाठी 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on vehicle (Basic facility development fund) खरेदी करणे कामी अनुभवी ठेकेदाराकडून ई-टेंडरींग पध्दतीने जाहिर निविदा सुचना दि. 15/06/2023 रोजीच्या दै. खबरे आजतक, दै.ग्लोबल टाईम्स व दै. कोकण सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. मुदतीत दि.26/06/2023 पर्यंत 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त 03 निविदाधारक मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांनी निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे विभागाने तपासली असून मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. त्यामुळे ते पात्र ठरत आहेत.

वरीलप्रमाणे मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस या पात्र निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेबाबत मा.निविदा समितीने दि. 14/07/2023 रोजी मा. निविदा समितीने शिफारस केली असून दि. 24/07/2023 रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) दि.01/08/2023 रोजी उघडण्यात आला असून खालीलप्रमाणे दर सादर केले असून मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांचे दर कमी आहेत. मात्र सादर केलेले दर बाजार भावाशी तुलना केली असता, जादा आहेत. त्यामुळे मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांचे समवेत दरात वाटाघाटी करणेसाठी दि.10/08/2023 रोजी दुपारी 3.00 वाजता निविदा समिती समोर बोलविले असता, मा.निविदा समिती अध्यक्ष यांचे समक्ष L1 निविदाधारक मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी दर कमी केले आहेत. सदरचे कमी केले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No | Description | मे. एन. जी. सेल्स यांनी निविदेत सादर केलेले दर | | मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर | | मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर | | L1 निविदाधारक मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रती नग दर | एकुण दर | प्रती नग दर | एकुण दर | प्रती नग दर | एकुण दर | प्रती नग दर | एकुण दर |
| 1 | Supply of 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on Vehicle (**10 नग**) | रु.10,00,000/- | रु.1,00,00,000/- | रु.9,99,999/- | रु.99,99,990/- | **रु.9,98,990/-** | **रु.99,89,900/-** | **रु.9,96,950/-** | **रु. 99,69,500/-** |

वरीलप्रमाणे L1 निविदाधारक मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी वाटघाटी अंती सादर केलेले दर बाजारभावशी तुलना केली असता, वाजवी असून त्यांची निविदा स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली आहे. तरी, वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराने मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली असुन मा. आयुक्त यांनी दि.08/09/2023 रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी, घनकचरा गोळा करण्यासाठी 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on vehicle (Basic facility development fund) खरेदी मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांची वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराची निविदा स्विकारणे, करारनामा करुन कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**(रवि पवार)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.९१ / ०९/२०२३ वेळ २.२०pm.
रजिस्टर नोंद अ. क्र. २०४ दि. २३/२५

निरीक्षक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\2.5 to 2.9 vehicel.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

## प्रशासकीय ठराव दि.१३/ ८ /2023

**प्रकरण क्र. :-** २०२ **घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on vehicle (Basic facility development fund) खरेदी कामी प्राप्त निविदेतील दरास मंजुरीबाबत. (Tender Id No. 2023_MBMC_915673_1)**

**ठराव क्र. :-** २०२

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा गोळा करण्यासाठी 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on vehicle (Basic facility development fund) खरेदी करणे कामी अनुभवी ठेकेदाराकडून ई-टेंडरींग पध्दतीने जाहिर निविदा सुचना दि. 15/06/2023 रोजीच्या दै. खबरे आजतक, दै. ग्लोबल टाईम्स व दै. कोकण सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. मुदतीत दि.26/06/2023 पर्यंत 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त 03 निविदाधारक मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांनी निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे विभागाने तपासली असून मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. त्यामुळे ते पात्र ठरत आहेत.

वरीलप्रमाणे मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस या पात्र निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेबाबत मा. निविदा समितीने दि. 14/07/2023 रोजी मा. निविदा समितीने शिफारस केली असून दि. 24/07/2023 रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) दि.01/08/2023 रोजी उघडण्यात आला असून खालीलप्रमाणे दर सादर केले असून मे. एन. जी. सेल्स, मे. साईप्रो इंटरप्रायजेस व मे. तुलसीराम इंटरप्रायजेस या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांचे दर कमी आहेत. मात्र सादर केलेले दर बाजार भावाशी तुलना केली असता, जादा आहेत. त्यामुळे मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांचे समवेत दरात वाटाघाटी करणेसाठी दि.10/08/2023 रोजी दुपारी 3.00 वाजता निविदा समिती समोर बोलविले असता, मा. निविदा समिती अध्यक्ष यांचे समक्ष L1 निविदाधारक मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी दर कमी केले आहेत. सदरचे कमी केले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Description | मे. एन. जी. सेल्स यांनी निविदेत सादर केलेले दर | | मे. तुलसीराम इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर | | मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर | | L1 निविदाधारक मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रती नग दर | एकुण दर | प्रती नग दर | एकुण दर | प्रती नग दर | एकुण दर | प्रती नग दर | एकुण दर |
| Supply of 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on Vehicle (**10 नग**) | रु.10,00,000/- | रु.1,00,00,000/- | रु.9,99,999/- | रु.99,99,990/- | **रु.9,98,990/-** | **रु.99,89,900/-** | **रु.9,96,950/-** | **रु.99,69,500/-** |

वरीलप्रमाणे L1 निविदाधारक मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांनी वाटघाटी अंती सादर केलेले दर बाजारभावशी तुलना केली असता, वाजवी असून त्यांची निविदा स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली आहे. तरी, वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराने मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली असुन मा. आयुक्त यांनी दि.08/09/2023 रोजी मजुरी दिलेली आहे.

तरी, घनकचरा गोळा करण्यासाठी 2.5 TO 2.9 cum CNG Hopper Tipper Dumper Mounted on vehicle (Basic facility development fund) खरेदी मे. साईप्रो इंटरप्रायजेस यांची वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराची निविदा स्विकारणे, करारनामा करुन कार्यादेश देणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. पारित ठरावानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि.१३/ ९ /2023

## (गोषवारा)

२०३

विषय :- महापालिकेच्या मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागाकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महापालिकेच्या मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागाकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशनयांचेकडून पुरवठा करणेबाबत जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/1925/2022-23, दि.22/12/2022 रोजीचे कार्यादेशान्वये दि.15/09/2022 ते दि.14/09/2023 रोजीपर्यंत 01 वर्षाकरीता करारनामा करण्यात आलेला आहे.

सदरचा करारनामा दि.14/09/2023 रोजी संपुष्टात येणार आहे. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत तसेच त्यांना नेमून दिलेले कामकाज उत्कृष्टरित्या पार पाडत असून प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 करीता अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणासाठी कार्यरत सुरक्षारक्षकांबाबत कुठल्याही प्रकारे प्रशासनाकडे तक्रार प्राप्त नाहीत. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षकांची मुख्य कार्यालयात नेमणूक झालेनंतर एखाद्या मोर्चा/आंदोलनाबाबत नियंत्रण आलेले असून महापालिकेमार्फत अभ्यांगतांना नेमून दिलेल्या वेळेत प्रवेशाबाबतची जबाबदारी सुरक्षारक्षकांकडून योग्यरित्या हाताळण्यात येत आहे.

**सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता एकुण 250 सुरक्षारक्षक पुरवठयासाठी नव्याने दि.15/09/2023 पासून ते दि.14/09/2024 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.7,09,56,000/- (रु.सात कोटी नऊ लाख छप्पन्न हजार मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.**

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव क्र. २०३    प्रशासकीय सभा दि.१३ / ९ /2023

प्रकरण क्र. २०३ महापालिकेच्या मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागाकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महापालिकेच्या मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागाकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/1925/2022-23, दि.22/12/2022 रोजीचे कार्यादेशान्वये दि.15/09/2022 ते दि.14/09/2023 रोजीपर्यंत 01 वर्षाकरीता करारनामा करण्यात आलेला आहे.

सदरचा करारनामा दि.14/09/2023 रोजी संपुष्टात येणार आहे. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत तसेच त्यांना नेमून दिलेले कामकाज उत्कृष्टरित्या पार पाडत असून प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 करीता अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणासाठी कार्यरत सुरक्षारक्षकांबाबत कुठल्याही प्रकारे प्रशासनाकडे तक्रार प्राप्त नाहीत. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षकांची मुख्य कार्यालयात नेमणूक झालेनंतर एखाद्या मोर्चा/आंदोलनाबाबत नियंत्रण आलेले असून महापालिकेमार्फत अभ्यांगतांना नेमून दिलेल्या वेळेत प्रवेशाबाबतची जबाबदारी सुरक्षारक्षकांकडून योग्यरित्या हाताळण्यात येत आहे.

सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता एकुण 250 सुरक्षारक्षक पुरवठयासाठी नव्याने दि.15/09/2023 पासून ते दि.14/09/2024 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.7,09,56,000/- (रु.सात कोटी नऊ लाख छप्पन्न हजार मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

| | |
|---|---|
| (वासुदेव शिरवळकर) | (संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.) |
| नगरसचिव | प्रशासक तथा आयुक्त |
| मिरा भाईंदर महानगरपालिका | मिरा भाईंदर महानगरपालिका |

Mayurasthapana Fd कृतिका प्रशासकीय ठराव - Copy.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

## प्रशासकीय गोषवारा दि. 23/ 8 /2023

**प्रकरण :- 204 मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या उपक्रम राबविणेकामी विविध कामास मंजुरीबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील झोपडपट्टी मध्ये अनारोग्याची परिस्थिती असते यामध्ये अमुलाग्र बदल करणे या हेतुने Mission RUDRA हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमा अंतर्गत झोपडपट्टी मधील नागरीकांमध्ये जनजागृती करणे, कचरा सेग्रीगेशन करणे, प्लास्टिक बंदी, हागणदारी मुक्त, वयक्तिक स्वच्छता याबाबीसाठी काम करण्यात येत आहे. झोपडपट्टीमधील लोकांमध्ये Behavior Change घडवून आणणे हा या उपक्रमाचा हेतु आहे. या उपक्रमामध्ये Making the Difference या अशासकीय संख्ये सोबत (NGO) मनपा हा उपक्रम राबवत आहे. स्वच्छ सर्वेक्षण 2023 अभियान अंतर्गत मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या अभियानाच्या लोगोचे अनावरण व मिशन RUDRA चा दि. 14 जुलै 2023 रोजी शुभारंभ गणेश देवलनगर झोपडपट्टी येथून करण्यात आला.

मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या मा. आयुक्त यांच्या अनोख्या संकल्पनेतून शहरातील झोपडपट्टी परिसरात स्वच्छता मोहीम, तेथील नागरिकांना ओला/ सुका कचरा वर्गीकरण, हगणदारी मुक्त परिसर, प्लास्टिक बंदी याबाबत विद्यार्थी, एनजीओ आणि महापालिका अधिकाऱ्यांमार्फत विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येणार आहे. नाल्यामध्ये कचरा न टाकता तो महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कचरा कुंडीमध्ये टाकण्याची सवय लावण्यासाठी मार्गदर्शन करणे. तसेच नागरिकांच्या सोयी सुविधेसाठी परिसरातील शौचालय व्यवस्थापन अत्यंत चांगल्या प्रकारे करण्यात येणार आहे. झोपडपट्टी मधील उजाड भिंती, गल्ल्यांची रंगरंगोटी करून सुशोभीकरण करणे, नाला स्क्रिनिंग जाळीने पुर्ण झाकणे इत्यादी उपक्रमाद्वारे सदर परिसरात जनजागृती करावी लागणार असून सदर कामी खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | नाव | नग/ फुट | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | स्वच्छतेबाबत संदेश देऊन भिंती रंगविणे | 16200 फुट | रु. 9,95,200/- |
| 2 | IEC Activity राबविणे | 80 कार्यक्रम | रु. 6,68,800/- |
| 3 | Digital Flex banner with wooden frame with Design, Making & Fixing Digital Flex banner (with wooden frame) (With Design), Vynel Sticker with Design | आवश्यकते नुसार | रु. 3,00,000/- |
| 4 | ट्रॉली, स्पिकर खरेदी करणे | 04 नग | रु. 87,200/- |
| 5 | नाला स्क्रिनिंग जाळी बसविणे | 1660 चौ.फुट | रु. 19,92,000/- |
| 6 | Spit Bins | 50 नग | रु. 8,80,000/- |
| | Refill Box | 300 नग | |

वरीलप्रमाणे अ.क्र. 01 ते 06 कामी रु. 49,23,200/- खर्च अपेक्षित असून सदर कामाचे स्वतंत्र दरपत्रक/ निविदा मागविणेस मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या उपक्रम राबविणेकामी उक्त 01 ते 06 कामाकरीता स्वतंत्र दरपत्रक/ निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु. 49,23,200/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

11.8.23

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**(रवि पवार)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

## प्रशासकीय ठराव दि.23/ 8 /2023

**प्रकरण :- 204 मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या उपक्रम राबविणेकामी विविध कामास मंजुरीबाबत.**

ठराव क्र.204

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील झोपडपट्टी मध्ये अनारोग्याची परिस्थिती असते यामध्ये अमुलाग्र बदल करणे या हेतुने Mission RUDRA हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमा अंतर्गत झोपडपट्टी मधील नागरीकांमध्ये जनजागृती करणे, कचरा सेग्रीगेशन करणे, प्लास्टिक बंदी, हागणदारी मुक्त, वयक्तिक स्वच्छता याबाबीसाठी काम करण्यात येत आहे. झोपडपट्टीमधील लोकांमध्ये Behavior Change घडवून आणणे हा या उपक्रमाचा हेतु आहे. या उपक्रमामध्ये Making the Difference या अशासकीय संख्ये सोबत (NGO) मनपा हा उपक्रम राबवत आहे. स्वच्छ सर्वेक्षण 2023 अभियान अंतर्गत मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या अभियानाच्या लोगोचे अनावरण व मिशन RUDRA चा दि. 14 जुलै 2023 रोजी शुभारंभ गणेश देवलनगर झोपडपट्टी येथून करण्यात आला.

मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या मा. आयुक्त यांच्या अनोख्या संकल्पनेतून शहरातील झोपडपट्टी परिसरात स्वच्छता मोहीम, तेथील नागरिकांना ओला/ सुका कचरा वर्गीकरण, हगणदारी मुक्त परिसर, प्लास्टिक बंदी याबाबत विद्यार्थी, एनजीओ आणि महापालिका अधिकाऱ्यांमार्फत विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येणार आहे. नाल्यामध्ये कचरा न टाकता तो महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कचरा कुंडीमध्ये टाकण्याची सवय लावण्यासाठी मार्गदर्शन करणे. तसेच नागरिकांच्या सोयी सुविधेसाठी परिसरातील शौचालय व्यवस्थापन अत्यंत चांगल्या प्रकारे करण्यात येणार आहे. झोपडपट्टी मधील उजाड भिंती, गल्ल्यांची रंगरंगोटी करून सुशोभीकरण करणे, नाला स्क्रिनिंग जाळीने पुर्ण झाकणे इत्यादी उपक्रमाद्वारे सदर परिसरात जनजागृती करावी लागणार असून सदर कामी खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | नाव | नग/ फुट | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | स्वच्छतेबाबत संदेश देऊन भिंती रंगविणे | 16200 फुट | रु. 9,95,200/- |
| 2 | IEC Activity राबविणे | 80 कार्यक्रम | रु. 6,68,800/- |
| 3 | Digital Flex banner with wooden frame with Design, Making & Fixing Digital Flex banner (with wooden frame) (With Design), Vynel Sticker with Design | आवश्यकतेनुसार | रु. 3,00,000/- |
| 4 | ट्रॉली, स्पिकर खरेदी करणे | 04 नग | रु. 87,200/- |
| 5 | नाला स्क्रिनिंग जाळी बसविणे | 1660 चौ.फुट | रु. 19,92,000/- |
| 6 | Spit Bins | 50 नग | रु. 8,80,000/- |
| | Refill Box | 300 नग | |

वरीलप्रमाणे अ.क्र. 01 ते 06 कामी रु. 49,23,200/- खर्च अपेक्षित असून सदर कामाचे स्वतंत्र दरपत्रक/ निविदा मागविणेस मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

मिशन RUDRA (Rapid Urban Drive For Rejuvenation Of Slum Area) या उपक्रम राबविणेकामी उक्त 01 ते 06 कामाकरीता स्वतंत्र दरपत्रक/ निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु. 49,23,200/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका